क्र.CIC/अ.क्र.६५९१/२०२६

श्री.सरदार रविंद्र सिंह

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव
नगर विकास विभाग (नवि-२२)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,
नगर विकास विभाग (नवि-२२)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित (तत्कालिन)
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
०६.११.२०२१	२४.१२.२०२१	१०.१२.२०२१	१२.०१.२०२२

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०६/११/२०२१ रोजीच्या जोडपत्रानुसार श्री.निलेश गुरुलिंग देशमुख यांचे निलंबनाचे आदेश, आरोप पत्र व या संदर्भात झालेल्या सर्व आवक जावक पत्रांची साक्षांकित प्रत मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती ही **कलम ८ (१) (त्र)** तसेच दि.१७.१०.२०१४ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार माननीय सर्वोच्च न्यायालय यांच्या **गिरीश रामचंद्र देशपांडे विरुद्ध केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणी परिच्छेद १२ व १३** मध्ये निर्गमित केलेल्या दिशा निर्देशांच्या विपरीत असल्याचे नमूद करीत माहिती देण्यास नकार दिला आहे. त्याविरुद्ध दाखल प्रथम अपील अर्जावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव श्रीमती प्रियांका कुलकर्णी छापवाले यांनी दि.२१.१२.२०२१ रोजी झालेल्या सुनावणीत व दि.१२.०१.२०२२ रोजी निर्गमित केलेल्या आदेशात माहिती देय अनुज्ञेयता तपासून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, नवि-१४ यांनी उपलब्ध करून द्यावी असे आदेश पारित केले आहेत. त्याविरुद्ध प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज अपिलार्थीनी दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी हजर नाहीत. तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित असून याप्रकरणी अपिलार्थीच्या **जोडपत्र अ** मध्ये नमूद केलेल्या यातील **कलम ८ (१) (त्र)** च्या तरतुदींचे अवलोकन केले असता यात संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबनाचे आदेश व त्यानंतर शासकीय सेवेत पुर्नस्थापित करण्याचे आदेश इत्यादी माहिती ही **कलम ८ (१) (त्र)** मध्ये बाधित होत नसल्याची वस्तूस्थिती लक्षात घेता वरील माहिती ही अपिलार्थीना विनामूल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६५९१/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : ०५.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**